MHSO110024812022

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५५/२०२२ मधील अर्ज (निशाणी क्रमांक ०५ व २६) वरील एकत्रित आदेश</u>**

निशाणी क्र. ५ वरील अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी विरूद्ध व निशाणी क्र. २६ वरील अर्ज प्रतिदाव्यातील वादी (मुळ दाव्यातील प्रतिवादी) यांनी मुळ वादींविरूद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केलेले आहेत.

**<u>मुळ वादीचे निशाणी ५ मधील कथन</u> :-**

**०२.** दावा कलम १अ गट नं ७८१/२ वादी क्र २ पांडुरंग माधव जाधव व १ब गट नं ७८२/२ ही वादी मदनसिंह हणुमंतराव जाधव यांचे मालकीची आहे. गट नं ७९०/४ ही प्रतिवादीचे मालकीची आहे. प्रतिवादीने तहसिलदार माळशिरस यांचे क्र/रस्ता/एसआर/२२/२०२० हे दावा (अर्ज) १९०६ चे कलम ५(२) प्रमाणे गट क्र ७८१/१ व ७८२/२ या जमिनच्या दरम्यान असलेला पाण्याचा पाट नांगरुन बंद केला आहे. तो खुला करुन निरंतर ताकिद देण्यासाठी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज तहसिलदार माळशिरस यांनी गट नं ७८१/१ व ७८२/२ चे पश्चिम बांधकडुन असणारे वहिवाटीचे पाटास हरकत अडथळा करु नये म्हणुन वादी विरुध्द निरंतराची ताकिद देण्याचा आदेश दिनांक ०४.०५.२०२२ रोजी केला. सदर आदेश चुकीचा व बेकायदेशीर असल्याने वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. वादीची जमीन बागायत असुन त्यामध्ये उसाचे पिक आहे. प्रतिवादीने तहसिलदार यांचे हुकुमाप्रमाणे कॅनॉलचा पाट तयार केल्यास वादीस त्याचे न्याय हक्कांस मुकावे लागुन वादीचे कधीही न भरुन येणारे अपरीमीत असे नुकसान होणार आहे. म्हणून मे. तहसिलदारसाो माळशिरस यांनी कॅनॉल पाट केस क्र/रस्ता/एसआर/२२/२०२० मध्ये गट क्र ७८१/१ व ७८२/२ चे पश्चिम बांधाने कॅनॉलचे पाटास हरक अडथळा करु नये या आदेशास दाव्याच्या अंतिम निकालाअखरे स्थगीती देण्याची विनंती वादीने केली आहे.

**०३.** प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे निशाणी २४ वर कैफियत/प्रतिदावा व

मनाई हुकुम अर्जावर म्हणणे दाखल करून वादीचे कथन नाकारले आहे. प्रतिवादीने असे कथन केले की, प्रतिवादी यांचे मयत पती राजेंद्र जाधव यांनी वादी यांचे विरुध्द नवीन रस्त्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे मयत राजेंद्र जाधव यांना सदरचा रस्ता मंजूर झाला. रस्त्याच्या बाजूने उत्तर-दक्षिण चालीचा पाण्याचा कॅनॉल पाट पूर्वीपासून आहे. परंतू सदरचा कॅनॉलचा पाट यातील वादी यांनी मागील ४ दिवसापूर्वी नांगरुन बंद केला आहे. प्रतिवादीस दुसरा कोणताही पर्यायी पाण्याचा पाट अस्तित्वात नाही. जर पाण्याचा पाट खुला न झाल्यास प्रतिवादी यांच्या मिळतीमध्ये उभी असलेली पिके पाण्याअभावी जळून जाणार आहेत. वादी हे पैशाच्या व मनुष्यबळाच्या जोरावर मे. तहसिलदार साो यांचे आदेशाचे पालन करीत नाहीत. त्यामुळे, त्यांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**<u>प्रतिदाव्यातील वादीचे निशाणी २६ मधील कथन</u> :-**

**०४.** वादी व प्रतिवादी हे एकाच घरातील असून वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती एकमेकांच्या लगत आहेत. मागील १५ दिवसापूर्वीपासून वादी हे प्रतिवादी यांना सदर रस्त्याने अगर त्यांचे मिळकतीमधून ये-जा करणेस मज्जाव / हरकत करत होते. म्हणून वादीचे मयत पती राजेंद्र जाधव यांनी प्रतिवादीं विरूध्द नविन रस्त्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे मयत राजेंद्र यांना सदरचा रस्ता मंजूर झाला. मंजूर रस्त्याच्या बाजूने उत्तर-दक्षिण चालीचा पाण्याचा कॅनॉल पाट पूर्वीपासून आहे. प्रतिवादी हे वादीस सदर कॅनॉल पाटाचे पाणी घेण्यास हरकत अडथळा करीत होते व आहेत. त्यांना दुसरा कोणताही पर्यायी पाण्याचा पाट अस्तित्वात नाही. वादीच्या विहीरीस मुबलक पाणी नाही. कॅनॉल पाटाचे पाणी पिकास न दिल्यास त्यांची पिके पाण्याअभावी जळून जाणार आहेत. म्हणून वादीने प्रस्तुत प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिदाव्याचा गुणान्वये निकाल होण्यास बराच कालावधी जाणार आहे. म्हणून दावा कलम १० (आय) या मिळकतीस कॅनॉल पाटातून पाणी घेणेस हरकत करु नये असा ताकिद मनाई आदेश होवुन मिळणेकामी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. यामुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान

होणार नाही. सबब, वादीचा ताकिद मनाई आदेश प्रतिवादींना देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** प्रतिदाव्यास मुळ वादीने निशाणी ३३ अन्वये आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले की, मुळ प्रतिवादी क्र १ चे मयत पती राजेंद्र यांनी मुळ वादी विरुध्द गट क्र ७८१/१ व ७८२/२ या जमिनीचे मधून गट क्र ७९०/४ या गटास रस्ता मिळणेसाठी तहसिलदार माळशिरस यांचेकडे रस्ता केस ३९/२०१५ दाखल केला होता. सदर केसचे कामकाज चालवते वेळी दिनांक ०९.०९.२०१६ रोजी तहसिलदार माळशिरस यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी पंचनामा केला होता सदर पंचनाम्यावेळी गट क्र ७८१/१ व ८७२/२ या जमिनींचे बांधावरुन पाण्याचा पाट अस्तित्वात नव्हता ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मुळ प्रतिवादीने प्रतिदाव्यात मागणी केलेला कॅनॉल पाट अस्तित्वात नाही. त्यामुळे मुळ प्रतिवादीस मनाई सारखी न्यायावर आधारित दादा मागण्याचा हक्क नाही. त्यामुळे मुळ प्रतिवादींचा तुर्तातूर्त ताकीद अर्ज रद्द होण्याची विनंती केली आहे.

**०६.** मुळ दाव्यातील व प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन येतात त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केले आहेत :-

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१.** | प्रथम दर्शनी केस कोणास आहे ? | ... प्रतिवादी. |
| **२.** | न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुने झुकलेला आहे ? | ... प्रतिवादी. |
| **३.** | कोणाचे अपरिमित नुकसान होणार आहे ? | ... प्रतिवादी. |
| **४.** | आदेश काय ? | ... निशाणी क्र ५ नामंजूर करण्यात येतो.<br>निशाणी क्र २६ मंजूर करण्यात येतो. |

**<u>:: कारणमिमांसा ::</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता</u> :-**

**०७.** मुद्दा क्र.१ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती होवुन नये म्हणुन ते एकत्रीत चर्चिले आहेत. (यापुढे मुळ वादीस वादी व मुळ प्रतिवादीस प्रतिवादी असा उल्लेख केला आहे)

**०८.** मुळ दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. वादीने निशाणी ०४ सोबत मौजे मळोली गट नं ७८१/१, ७८२/२, ४९०/४ यांचे सातबारा उतारे तसेच रस्ता केस क्र/रस्ता/एसआर/२२/२०२० मधील नि.क्र. १, वादीने अर्जास दिलेले म्हणणे, प्रतिवादींचा सरतपास व उलटतपास तसेच निकालपत्र यांच्या नकला दाखल केल्या आहेत.

**०९.** याउलट प्रतिवादीने निशाणी ६६ सोबत रेमुनं ४६९/२०१७ मधील निशाणी क्र १ ची नक्कल, दिनांक ०५.०१.२००५, ३१.०३.२००९, १०. ०३.२०१०, १०.०३.२०१०, २३.०२.२०२३, २३.०२.२०२३ तसेच २६.०८. २०२१ रोजीच्या पाणीपट्टीच्या रकमेच्या प्रमाणित पावत्या, दिनांक २२.०३. २०१०, ०९.०३.२०११, ०५.१०.२०१६, २२.०२.२०२२ पाणी अर्जाच्या प्रमाणित प्रती, ब्लॉक मोबदला अर्ज ही कागदपत्रे दाखल केली आहेत.

**१०.** वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, मा. तहसीलदार यांनी पाट केस क्रमांक ६३/२०२० मध्ये गट क्र ७८१/१ व ७८२/२ च्या बांधावरील कॅनॉलच्या पाटास हरकत अडथळा करु नये असा आदेश दिला आहे. सदर आदेश त्यांनी मामलेतदार ॲक्टच्या अधिनियमात राहून पारीत केलेले आहे. सदरचा आदेश बेकायदेशीर व चुकीचा आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये गट नं ७९०/४ असेलेली जमीन गट नं. ७८१/१, ७८२/२ मधुन कॅनॉचा पाट खुला करुन मिळावा या करीता कॅनॉल पाट केस दाखल केला होता. परंतु मा. तहसीलदार यांनी प्रतिवादीचा कोणताही पुरावा शपथेवर न घेता गट नं ७८१/२ च्या ७८२/२ च्या पश्चिम बांधाकडे असणा-या वहिवाटीच्या पाण्याच्या

पाटास हरकत अडथळा करु नये असा निरंतर तकीद आदेश दिला आहे. सदरचा आदेश तहसीलदार यांनी अभिलेखावर आलेला पुरावा विचारात न घेता चुकीचा निकाल दिला आहे. प्रतिवादीने सदरचा अर्ज मुदतीत दाखल केला नसल्याने मा. तहसीलदार यांनी पारीत केलेला आदेश बेकायदेशीर आहे. ज्या ठिकाणावरुन प्रतिवादीची मागणी नाही अशा ठिकाणावरुन दिलेला आदेश बेकायदेशीर आणि चुकीचा आहे. प्रतिवादीस वादीच्या जमीनीतून पाणी घेण्याचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. असे असतांनाही मा. तहसीलदार यांनी सदरचा आदेश दिला आहे. प्रतिवादीने मागणी केलेल्या ठिकाणी पाईप लाईनचे चेंबर आहे. वादीच्या जमीनीतून कॅनॉलचा पाट आहे याबाबत कोणताही पुरावा नसतांना सदर पाट अस्तित्वात आहे असे चुकीचे अनुमान काढून सदर आदेश पारीत केला आहे. वादीची जमीन बागायती असून त्यामध्ये उसाचे पिक आहे. सदर जमीनीत पाण्याचा पाट खुला केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी सदरच्या आदेशास स्थगीती देण्यात यावी असा युक्तीवाद वादीच्या वकीलांनी केला.

**११.** प्रतिवादींच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, ते पाटाच्या पाण्याचा वापर करत असून लगत कब्जेदार आहेत. प्रतिवादी हा सहहिस्सेदार असून त्यास सदर पाणी घेण्याचा अग्रहक्क आहे. कॅनॉलचा पाट अस्तित्वात आहे किंवा नाही ही बाब योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर ठरणार आहे. प्रतिवादी हा सदर पाटामधून गेली कित्येक वर्षापासून पाणी घेत असून त्या बाबतच्या पावत्या त्याने अभिलेखावर दाखल केल्या आहेत. वादी हा प्रतिवादींना कॅनॉलचे पाणी घेण्यास हरकत अडथळा करीत आहे. प्रतिवादी यांना पर्यायी पाण्याचा पाट अस्तित्वात नसल्याने त्यांच्या मिळकतीमध्ये असलेली पिके जळून जाणार आहेत. प्रतिवादीस मुबलक पाणी नाही. तरी प्रतिवादीने वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**१२.** वादीचे मा. विधीज्ञ त्यांचे युक्तीवादाकामी खालील न्यायनिवाडयावर अवलंबून आहेत.

**1. Hon'ble High Court of Bombay (Nagpur Bench) in Gaurakshan Sansthan, Murtizapur Vs State of Maharashtra & Ors (2019(3) ALL MR 849).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***'कोर्ट कायदा कलम ७ व ८ च्या तरतुदींचे पालन करणे अनिवार्य आहे. तसेच तहसीलदार यांना कलम १० च्या तरतुदींचा आधार घेणे आवश्यक आहे'.*** सदर दाव्यात उपरोक्त तरतुदींचे पालन न केल्याने मा. उच्च न्यायालयाने तहसीलदार यांनी पारीत केलेला आदेश रद्द होण्यास पात्र आहे असे प्रमाण नोंदविले. प्रस्तुत दाव्यात वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी मामलेतदार कायदा कलम ७ च्या तरतुदींचे पालन न करता अर्ज व शपथपत्र दिले आहे. परंतु सदर बाब योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे. दाव्याच्या या टप्यामध्ये प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज मामलेतदार कायद्याच्या तरतुदींचे पालन न करता दाखल केला आहे, असे गृहीत धरता येणार नाही. त्यामुळे सदर न्यायनिर्णयामधील प्रमाण दाव्याच्या या टप्यात वादीस उपयुक्त ठरणारे नाही.

**2. Hon'ble High Court of Bombay (Nagpur Bench) in Mohommad Khan Vs Shri Shankar s/o. Maruoti Dhage & Anr (2017(3) ALL MR 380).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***'सदर कायद्याअंतर्गत अधिका-यांनी दिलेला आदेश अंतीम नाही. सदर आदेश दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन आहे'.*** प्रस्तुत दाव्यात वादीच्या कथनाप्रमाणे सदर दावा या न्यायालयास चालविण्याचा अधिकार आहे. परंतु प्रतिवादी यांनी या बाबत कोणताही अक्षेप घेतला नाही. सबब, वादीने उपस्थीत केलेला मुद्दा गृहीत धरता येणार नाही.

**3. Hon’ble High Court of Bombay (Aurangabad Bench) in Sanjay Pandit Patil Vs Smt. Latabai Walmik Marathe & Ors (2021(6) ALL MR 578).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***‘कलम ८ ते १५ च्या तरतुदींचे पालन न करता वादींना सुनावणीची संधी न देता पारीत केलेला आदेश रद्द होण्यास पात्र आहे’.*** परंतु प्रस्तुत बाब ही योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे. त्यामुळे दाव्याच्या या टप्यात तहसीलदार यांनी वादींना संधी न देता आदेश पारीत केला असे गृहीत धरणे उचीत होणार नाही. सबब, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण वादीस दाव्याच्या या टप्यात उपयुक्त ठरणारे नाही.

**5. Hon’ble High Court of Bombay (Nagpur Bench) in Shankar Govindrao Sarnaik & Anr. Vs. Sub Divisional Officer, Washim & Ors (2012(3) ALL MR 669).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***‘मामलेदार कोर्ट कायद्याअन्वये तहसीलदार यांनी पारीत केलेला आदेश बाजुला सारण्याकामी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला जावू शकतो’.*** वादीच्या कथनाप्रमाणे वादीस सदर दावा दिवाणी न्यायालयात दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतू या बाबत प्रतिवादीने कोणताही अक्षेप नोंदविलेला नाही, त्यामुळे उपरोक्त न्यायानिर्णयामधील प्रमाण वादीस उपयुक्त ठरणारे नाही.

**6. Hon’ble High Court of Bombay in Jalindare Dhondiram Kothule & Ors. Vs. Raju Raosaheb Gobare & Ors. (2022 NearLaw (BombayHC**

**Aurangabad) Online 2723).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***'तहसीलदार यांच्याकडे सदर अर्ज दाव्यास कारण घडल्यापासून सहा महिन्यांच्या आत दाखल करणे अनिवार्य आहे. कलम २ अन्वये मामलेतदारांचे अधिकारक्षेत्र अडथळा दुर करण्यापुरते मर्यादीत आहे. नवीन प्रवेश निर्मितीचे निर्देश देण्याचा कोणताही अधिकार क्षेत्र नाही'.*** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी मामलेतदार यांच्याकडील दाखल केलेला अर्ज मुदतीत दाखल न केल्याने तो रद्द होण्यास पात्र आहे. परंतु प्रस्तुत बाब ही योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे. सबब, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण वादीस दाव्याच्या या टप्यात उपयुक्त ठरणारे नाही.

**7. Hon'ble Supreme Court of India in Mrs. Akella Lalitha Vs Shri Konda Hanumantha Rao & Anr. (2022 LiveLaw (SC) 638).** या न्यायानिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***'दाव्यात मागणी केलेली नसतांना न्यायालयाने जर अशी मागणी मान्य केली तर ती न्यायाचा अपव्यय होईल'.*** वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी मागणी केलेली नसतांनाही मा. तहसीलदार यांनी गट क्र ७८१/२ व गट क्र ७८२/२ च्या पश्चिम बांधाकडे असणा-या वहिवाटीच्या पाण्याच्या पाटास वादींनी हरकत अडथळा करु नये असा आदेश पारीत केला आहे. परंतु प्रस्तुत बाब ही योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे. सबब, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण वादीस दाव्याच्या या टप्यात उपयुक्त ठरणारे नाही.

**8. Hon'ble High Court of Bombay (Panaji Bench) in Shri Jitendra Raghuraj Deshprabhu &**

**Anr. Vs. Shri Mohan Navso Kalsekar & Ors (2015(3) ALL MR 584).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***'पाण्याच्या मुक्त प्रवाहात कोणताही अडथळा निर्माण केल्याचा पुरावा नसतांना त्यास अडथळा आणू शकते केवळ या भितीच्या आधारावर मामलेतदार मनाई आदेश जारी करु शकत नाहीत'.*** वादीच्या कथनाप्रमाणे त्यांनी प्रतिवादींना कधीही हरकत अडथळा केला नाही. मा. तहसीलदार यांनी पारीत केलेला आदेश बेकायदेशीर आहे. परंतु प्रस्तुत बाब ही योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे.सबब, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण वादीस दाव्याच्या या टप्यात उपयुक्त ठरणारे नाही.

**9. Hon'ble High Court of Bombay in Dhondiram Rajaram Salunkhe Vs Dinkar Parshuram Salunkhe & Ors (2019(1) ALL MR 653).** या न्यायानिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले की, ***' कोणत्याही मालकी हक्का शिवाय किंवा सदर रस्त्याचा वापर किंवा उपभोगाचा प्रथमदर्शनी पुरावा नसतांना केलेला दाव्यात मनाई आदेश नाकारण्यात आला'.*** वादीच्या कथनाप्रमाणे त्यांनी प्रतिवादींना कधीही हरकत अडथळा केला नाही. मा. तहसीलदार यांनी पारीत केलेला आदेश बेकायदेशीर आहे. परंतु प्रस्तुत बाब ही योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे.सबब, सदर न्यायनिर्णयाचे प्रमाण वादीस दाव्याच्या या टप्यात उपयुक्त ठरणारे नाही.

**१३.** तसेच प्रतिवादीचे मा. विधीज्ञ त्यांचे युक्तीवादाकामी खालील न्यायनिवाडयावर अवलंबून आहेत

**1. Hon'ble High Court of Bombay (Nagpur**

**Bench) Laxman Bisan Uke & Ors. Vs. Ashok Ishwar Shinde & Anr (2018(2) ALL MR 765).** सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले आहे की, ***'जेव्हा कागदपत्रांवरुन ज्यांचा हक्क स्पष्ट होतो त्यावर कोणताही दावा नसलेला व्यक्ती दुस-या व्यक्तीचे हक्क नाकारतो तेव्हा हक्क असलेल्या व्यक्तीस घोषणेसाठी दावा दाखल करण्याची आवश्यकता नाही. मनाई आदेशाकामीचा दावा पुरेसा आहे'.***

**2. Hon'ble High Court of Bombay (Nagpur Bench) in Sarladevi Widow of Kundanlal Vs. Shailesh Gourishnkar Namdeo (LAWS(BOM)-1995-11-62).** सदर न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे प्रमाण नोंदविले आहे की, ***'मिळकतीवर ज्या व्यक्तीचा ताबा आहे त्यास कायद्याच्या योग्य प्रक्रियेचा अवलंब केल्या शिवाय बेदखल करता येणार नाही'***

**१४.** उपरोक्त न्यायनिर्णयामधील प्रमाण हे प्रतिवादीच्या दाव्यास लागू होत आहे. प्रतिवादीने वादातील पाटातून पाणी घेत असल्याबाबात कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल करुन सदर पाण्यावर त्याचा हक्क असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर हक्क वादी नाकारु शकत नाही.

**१५.** वादी प्रतिवादींच्या युक्तीवादावरुन व दाखल कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तहसीलदार यांनी कॅनॉल पाट केस ६३/२०२० मध्ये गट क्र ७८१/१ व ७८२/२ च्या पश्चिम बांधाने वादींनी कॅनॉलच्या पाटास हरकत अडथळा करु नये असा आदेश दिला आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादीने गट क्र ७८१/१ व ७८२/२ च्या मधून जाणारा कॅनॉलचा पाट नांगरुन बंद केला तो खुला मिळणे कामी प्रस्तुत अर्ज दिला होता. परंतु मा. तहसीलदार यांनी ७८१/२

व ७८२/२ च्या पश्चिम बांधाकडे असणा-या वहिवाटीच्या पाण्याच्या पाटास वादींनी हरकत अडथळा करु नये असा आदेश पारीत केला आहे.

**१६.** वादीच्या कथनाप्रमाणे असा पाट हा त्यांच्या शेतातून जात नाही. वादीची जमीन बागायत असून त्यामध्ये उसाचे पिक आहे. सदर जमीनीतून कॅनॉलचा पाट तयार केल्यास वादीचे नुकसान होईल. परंतु, वादीने त्याकामी कोणतेही कागदोपत्री पुरावा अथवा फोटोग्राफ्स दाखल केले नाहीत. ज्यावरुन सदर कॅनॉल हा वादीच्या मिळकतीमधून मंजूर केला आहे असे दिसून येईल. दाव्यासोबत कच्चा हातनकाशा ही दाखल केला नाही जेणेकरुन वादादीत विषयाची वस्तुस्थिती अभिलेखावर येईल. वादीच्या कथनाप्रमाणे सदर पाटातून प्रतिवादीने पाणी घेतल्यास वादीचे नुकसान होणार आहे. परंतु वादीचे कोणते नुकसान होणार आहे हे त्यांनी स्पष्टपणे नमुद केले नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी तहसीलदार यांच्या हुकूमाप्रमाणे कॅनॉलचा पाट तयार केल्यास वादीचे नुकसान होणार आहे. परंतु तहसीलदार यांचा आदेश व निष्कर्षाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मळोली-शेरी रस्त्याच्या दक्षिणेकडून दक्षिण-उत्तर चालीचा पाण्याचा पाट असून सदरचा पाट प्रतिवादी यांच्या बांधाकडे आहे ते उत्तरेस मळोली-शेरी रस्त्यास छेदून जात असून प्रतिवादी यांच्या मळोली शेरी रस्त्याचे उत्तरेकडील क्षेत्राच्या पश्चिम दक्षिण कोप-यात पुर्वेस व पश्चिमेस रस्त्याच्या समांतर असा वाहत असल्याचे दिसून आले. त्यामुळे जमीन गट क्र ७८१/१ व ७८२/२ तसेच लगत शेत खातेदार यांच्या जमीनीकरीता कॅनॉल पाट अस्तित्वात असल्याचे तसेच सदरचे पाट दोन महिन्यात संपूर्ण नष्ट केल्याचे स्थळपाहणी वेळी निदर्शनास आले. प्रतिवादी यांनी सदर पाटातून पिकासाठी पाणी घेतल्याचे ही पाणी पट्टी पावत्यावरुन त्यांना दिसून आले. तरी मा. तहसीलदार यांनी गट क्र ७८१/१ व ७८२/२ च्या पश्चिम बांधाकडून असणा-या वहिवाटीच्या पाण्याच्या पाटास हरकत अडथळा निर्माण करुन बंद केल्याबाबत दावा मान्य करुन वादीने प्रतिवादीच्या वहिवाटीच्या पाण्याच्या पाटास हरकत अडथळा न करण्याची निरंतर ताकीद देण्यात आली.

**१७.** वादीच्या कथनाप्रमाणे तहसीलदार यांनी सदरचा निकाल हा योग्य त्या पुराव्याचे अवलोकन न करता चुकीचा व बेकायदेशीर असल्याचे कथन केले आहे. परंतु तहसीदार यांनी दिलेला निकाल बेकायदेशीर असून कायद्याच्या तरतुदींचे पालन न करता पारीत केला आहे असे दाव्याच्या या टप्यामध्ये गृहीत धरता येणार नाही. मा तहसीलदार यांच्या निकालाप्रमाणे गट क्र ७८१ व ७८२ च्या पश्चिम बांधाने कॅनॉल पाट असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी हे पाटातील पाणी घेत आहेत हे दाखविण्यासाठी त्यांनी अभिलेखावर पावत्या दाखल केल्या आहेत, ज्यावरुन प्रतिवादी पाटातील पाणी घेत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१८.** या ठिकाणी असे नमुद करावेसे वाटते की, वादीने सदरचा निकाल हा बेकायदेशीर असून तो स्थगीत होवून मिळणेकामी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. दाव्याच्या या टप्प्यामध्ये प्रस्तुत आदेश हा चुकीचा व बेकायदेशीर असुन कायद्याच्या तरतुदींचे पालन न करता पारीत केला आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. तरी मा तहसीलदार यांनी कॅनॉल पाट केस ६३/२०२० मध्ये दिलेला आदेश हा बेकायदेशीर आहे किंवा नाही ही बाब योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे. परंतु प्रस्तुत आदेशास स्थगीती दिल्यास प्रतिवादी व इतर लगत शेतकरी जे या पाटातून त्यांच्या पिकासाठी पाणी घ ेत आहेत त्यांचे नुकसान होणार आहे. वादीचा दावा हा योग्य तो पुरावा अभिलेखावर आल्यानंतर शाबीत होणार आहे तरी दाव्याच्या या टप्प्यात सदर आदेशास स्थगीती दिल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे. सदर दाव्याचा निकाल होण्यास बराच कालावधी जाणार आहे. अशा परिस्थीतीमध्ये जर आदेशास स्थगीती दिली तर प्रतिवादीचे नुकसान होईल. परंतु सदर पाण्याच्या पाटातील पाणी प्रतिवादी यांनी त्यांच्या पिकासाठी घेतले तर वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**१९.** वरील सर्व चर्चेवरुन असा निष्कर्ष येतो की, प्रतिवादीस प्रथमदर्शनी केस आहे. न्यायाचा तराजू देखील प्रतिवादीच्याच बाजून झुकलेले

आहे. जर मनाई आदेश नाकारला तरी वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. न्यायाच्यादृष्टीने कोणासही पाण्याचा वापर करण्यापासून वंचीत ठेवणे योग्य होणार नाही. सदरच्या आदेशामध्ये सदरचा पाट हा वादीच्या जमीनीतून असल्याबाबतचा कोणताही निष्कर्ष मा तहसीलदार यांनी काढलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादीने सदर पाटाच्या पाण्याच्या वापर प्रतिवादीच्या बांधास कोणताही धक्का न पोहचता करणे योग्य होईल. तरी प्रतिवादीने वादीच्या जमीनीत हरकत अडथळा न करता पाटाच्या पाण्याचा वापर करावयाचा आहे, या निष्कर्षाप्रत मी पोहोचली आहे. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष मी त्या त्या प्रमाणे नोंदवले आहेत व मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे. :-

**:: आदेश ::**

१. निशाणी क्र ५ नामंजूर करण्यात येत आहे.

२. निशाणी क्र २६ मंजूर करण्यात येत आहे.

३. प्रतिवादीने सदर पाटाच्या पाण्याच्या वापर वादीच्या बांधास कोणताही अडथळा न पोहचवता करावयाचा आहे.

४. वादी यांनी प्रतिवादी यांना दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत कॅनॉल पाटातून पाणी घेण्यास स्वत: तसेच त्यांच्या मार्फत मुखत्यार, एजंट, नोकर-चाकर, वाली-वारस इत्यादी करवी शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा निर्माण करु नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GAIKWAD MOHINI JANU
Date: 2025.10.27 12:50:13 +0530

ठिकाण :- माळशिरस.
दिनांक :- १३/१०/२०२५.

**(एम. जे. गायकवाड)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
माळशिरस